# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः26.10.2025** **वारःरविवार**

---

1. महानुभाव पंथानं मराठी भाषेला दिलेल्या समृद्ध योगदानाची दखल घेत रिध्दपूर इथं जागतिक कीर्तीचं मराठी भाषा विद्यापीठ उभारणार-मुख्यमंत्र्यांची ग्वाही,
2. राज्यातील पशुधन नुकसान भरपाईचे निकष बदलले, आता प्रत्येक जनावराच्या मृत्यूची भरपाई पशुपालकांना मिळणार,
3. राज्य परिवहन महामंडळातर्फे 'सजग प्रवासी, सुरक्षित प्रवास' जनजागृती मोहीम,
4. ज्येष्ठ अभिनेते सतीश शाह यांचं दीर्घ आजारानं मुंबईत निधन,
5. पन्नास षटकांच्या तिसऱ्या सामन्यात भारताचा ऑस्ट्रेलियावर नऊ गडी राखून विजय, ॲथलेटीक्समध्ये भारतीय खेळाडूंची 15 पदकांची कमाई, आणि
6. राज्याच्या बहुतांश भागात मुसळधार पावसाची शक्यता.

**महानुभाव अधिवेशन**

'सर्वज्ञ चक्रधर स्वामींनी सामान्य माणसाला आध्यात्मिक दिशा दाखविण्याबरोबर समाजात समता स्थापन करण्याचा विचार दिला. ही विचारसरणी राज्यासह देशासाठी महत्वाची आहे', असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. नाशिक इथं आयोजित अखिल भारतीय महानुभाव परिषदेच्या 38 व्या अधिवेशनात ते काल बोलत होते. यावेळी जलसंपदामंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे, खासदार भास्कर भगरे, परिषदेचे नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष मोहन कारंजेकर बाबा यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

रिद्धपूर या तीर्थक्षेत्रानं मराठी भाषा जिवंत ठेवण्याचं काम केलं असून या समृद्ध योगदानाची दखल घेत रिध्दपूर इथं मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करण्यात आलं आहे. हे विद्यापीठ जागतिक कीर्तीचं व्हावं यासाठी प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाहीही मुख्यमंत्र्यांनी दिली. ते म्हणाले.......

**गुजरातमधनं ते आपल्या विदर्भाच्या महाराष्ट्राच्या मातीमध्ये आले. पण या ठिकाणी मराठीची जी सेवा त्यांनी केली. आज आपली मराठी भाषा अभिजात झाली या अभिजात भाषेच्या संपूर्ण प्रवासामध्ये दोन ग्रंथ, हे अत्यंत महत्त्वाचे ठरले की ज्यांनी आपल्या भाषेच्या अभिजात असण्याचा पुरावा दिला त्यातला एक ग्रंथ ज्ञानेश्वरी आहे तर दुसरा ग्रंथ लीळा चरित्र आहे.**

'महानुभाव पंथाच्या समस्या सोडविण्यात येतील', असंही मुख्यमंत्री म्हणाले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी महानुभव पंथीयांचे अनेक प्रश्न सोडवल्याचं परिषदेचे नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष मोहन कारंजेकर बाबा यांनी याप्रसंगी नमूद केलं.

**निधी-नाशिक**

त्र्यंबकेश्वर इथल्या श्री त्र्यंबकेश्वर देवस्थानच्या माध्यमातून मुख्यमंत्री सहायता निधीसाठी 1 कोटी 11 लाख रुपयांचा धनादेश काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. दरम्यान, नाशिकमध्ये कालपासून सुरू झालेल्या महानुभव पंथीयाच्या परिषदेच्या उदघाटन सोहळ्यात नाशिकमधील निवृत्त बँक अधिकारी माणिक घुले आणि विलास घुले यांनी 10 लाख रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री फडणवीस यांना दिला.

**जनावर भरपाई**

विविध कारणांनी पशुधनाच्या नुकसानापोटी मिळणाऱ्या भरपाईचे निकष आता बदलण्यात आले आहेत. त्यानुसार आता प्रत्येक जनावराच्या मृत्यूची नुकसान भरपाई पशुपालकांना मिळणार आहे. पूर्वीच्या नियमानुसार केवळ तीन जनावरांसाठी मदत दिली जात होती. राज्यात यंदा झालेल्या अतिवृष्टीनं शेतीबरोबरच 28 जिल्ह्यांमध्ये पशुधनाचं मोठं नुकसान झालं आहे. त्या पार्श्वभूमीवर हा बदल करण्यात आला आहे, अशी माहिती पुणे पशुसंवर्धन आयुक्त डॉक्टर प्रवीणकुमार देवरे यांनी दिली. विविध जिल्ह्यात लहान-मोठी आठ हजार 678 जनावरे आणि दीड लाखांहून अधिक कोंबड्या मृत झाल्या आहेत. या सर्वांना शासनाच्या मदत आणि पुनर्वसन विभागामार्फत नुकसानभरपाई दिली जाणार असून, दुधाळ आणि ओढकाम करणाऱ्या पशुधनाच्या भरपाईवरील तीन प्राण्यांची मर्यादा आता शिथिल करण्यात आली आहे.

**एस टी अभियान**

आंध्र प्रदेशातील कुर्नूल जिल्ह्यात काही दिवसांपूर्वी बसला लागलेल्या आगीत 20 प्रवाशांचा दुर्दैवी मृत्यू झाला. अशा दुर्घटना टाळण्यासाठी आणि आपत्कालीन प्रसंगी योग्य प्रतिसाद देण्याकरिता राज्य परिवहन महामंडळानं शयनसुविधा असलेल्या बसगाड्यांसाठी 'सजग प्रवासी, सुरक्षित प्रवास' अभियान सुरू केलं आहे, अशी माहिती परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी काल दिली. परिवहन विभागानं दिलेल्या सूचनांनुसार प्रवाशांनी काही बाबींचं पालन करावं, असं आवाहन करण्यात आलं आहे. त्यानुसार, बसमध्ये बसल्यानंतर प्रवाश्यांनी बाहेर पडण्याचे सर्व मार्ग पाहून ठेवावेत, आपत्कालीन दरवाज्यासमोर सामान ठेवू नये, हातोडी आणि तिचा वापर माहिती करून घ्यावा आणि संकटाच्या वेळी घाबरून न जाता शांतपणे कृती करावी, असं सांगण्यात आलं आहे.

**मन की बात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी 11 वाजता आकाशवाणीवरील 'मन की बात' या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधतील. या कार्यक्रमाचा हा 127 वा भाग आहे.

**डॉक्टर हत्या**

सातारा जिल्ह्यात फलटण उपजिल्हा रुग्णालयातल्या महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणी पोलिसांनी प्रशांत बनकर या एका निलंबित पोलीस कर्मचाऱ्याला ताब्यात घेतलं आहे. या प्रकरणातला दुसरा आरोपी असलेला पोलीस कर्मचारी फरार असून, त्याचा शोध सुरु आहे. संबंधित महिला डॉक्टरचा छळ केल्याप्रकरणी या दोन्ही आरोपीं विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याविषयी अधिक माहिती देताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.....

**साताऱ्याची जी डॉक्टर महिला तिच्याबद्दल जे काही घटना झालेली आहे अतिशय दुर्दैवी घटना आहे. मी एसपींच्या बरोबर चर्चा केलेली आहे. आरोपीला एका अटक झालेली आहे आणि तात्काळ जे जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई होईल. कुणालाही पाठीशी घातलं जाणार नाही बिलकुल कठोर कारवाई या ठिकाणी झाली पाहिजे अशा प्रकारचं स्वतः मी एसपींशी बोललेलो आहे.**

**नीती आयोग पथक-सिंधुदुर्ग**

प्रशासकीय कामकाजात कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर करणारा देशातला पहिला जिल्हा ठरलेल्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या कामकाजाची पाहणी करण्यासाठी नीती आयोगाचं एक पथक 30 आणि 31 ऑक्टोबरला सिंधुदुर्गात येत आहे. पालकमंत्री नितेश राणे यांनी काल ओरोस इथं पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. नीती आयोगाचं पथक या दौऱ्यात आरोग्य, शिक्षण, संरक्षण आणि कृषी विभागात कृत्रिम बुद्धीमत्तेच्या सहाय्यानं सुरु असलेल्या कामांचा अभ्यास करणार आहे.

**सतीश शहा-निधन**

ज्येष्ठ अभिनेते सतीश शाह यांचं काल मुंबईत निधन झालं. ते 74 वर्षांचे होते. गेल्या अनेक दिवसांपासून ते मूत्रपिंडाच्या विकारानं ग्रस्त होते. जाने भी दो यारो, शक्ती, हम आपके है कौन, हम साथ साथ हैं, मैं हूं ना, कल हो ना हो, फना, ओम शांती

ओम आणि इतर चित्रपटांसह दूरचित्रवाणीच्या अनेक मालिका, जाहिरातपट तसंच विविध नाटकांतूनही त्यांनी काम केलं होतं. साराभाई वर्सेस साराभाई मालिकेतील इंद्रवदन ही त्यांनी साकारलेली व्यक्तिरेखा रसिकांच्या आजही स्मरणात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सतीश शाह यांना श्रद्धांजली अर्पण करतांना, सहज-सुंदर अभिनयातून साकारलेल्या भूमिकांच्या रुपांमध्ये ते रसिकांच्या मनात चिरंतन राहतील, अशी भावना व्यक्त केली आहे.

**क्रिकेट**

भारत आणि ऑस्ट्रेलिया दरम्यान पन्नास षटकांचा तिसरा आणि अंतिम सामना भारतानं 9 गडी राखून जिंकला. प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियानं 236 धावा केल्या. भारताकडून हर्षित राणानं सर्वाधिक 4 गडी बाद केले. प्रत्युत्तरादाखल सलामीवीर रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी नाबाद 168 धावांची भागीदारीच्या जोरावर भारतानं 11 षटकं आणि 3 चेंडू राखून हा सामना जिंकला. रोहितनं 121 तर मालिकेतील पहिल्या दोन्ही सामन्यात शून्यावर बाद झालेल्या विराट कोहलीनं 74 धावा केल्या. आता दोन्ही संघांदरम्यान येत्या 29 ऑक्टोबरपासून कॅनबेरा इथं वीस षटकांच्या 5 सामन्यांच्या मालिकेला सुरुवात होणार आहे.

महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा सामना बांगलादेशविरुद्ध नवी मुंबईतल्या डी वाय पाटील मैदानावर होणार आहे. भारतीय महिला संघ यापूर्वीच उपांत्य फेरीत पोहोचला आहे.

**ॲथलेटीक्स**

रांची इथं सुरू असलेल्या चौथ्या दक्षिण आशिया ॲथलेटिक्स स्पर्धेमध्ये कालच्या पहिल्याच दिवशी पाच सुवर्ण पदकांसह भारतानं 15 पदकांची कमाई केली आहे. पुरुषांच्या पांच हजार मीटर धावण्याच्या स्पर्धेमध्ये भारताच्या प्रिन्स कुमारनं देशाला या स्पर्धेतलं पहिलं सुवर्णपदक जिंकून दिलं. महिलांच्या पांच हजार मीटर धावण्याच्या स्पर्धेत भारताच्या संजना सिंग हिनं सुवर्ण, तर सीमानं रौप्य पदक मिळवलं. पुरुषांच्या गोळाफेक स्पर्धेमध्ये समरदीप सिंग गिल यानं सुवर्ण पदक पटकावलं. भारताच्या रवी कुमारनं दुसरा तर श्रीलंकेच्या स्पर्धकानं तिसरा क्रमांक पटकावला. महिलांच्या गोळाफेक स्पर्धेमध्ये भारताच्या योगितानं सुवर्ण तर शिखानं रौप्य पदक पटकावलं. महिलांच्या उंच उडी स्पर्धेमध्ये पूर्वा सावंतनं रौप्य पदक मिळवलं आहे.

**पाऊस**

धुळे जिल्ह्यात काल सलग दुसऱ्या दिवशी पुन्हा एकदा अवकाळी पावसानं तडाखा दिला. गडचिरोलीमध्ये काल संध्याकाळी चारच्या सुमारास पावसामुळं अनेक भागातलं जनजीवन विस्कळीत झालं.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात भातशेतीच्या नुकसानाचे पंचनामे सुरू असून, याचा आढावा पूर्ण होताच बाधित शेतकऱ्यांच्या खात्यात तातडीनं मदत जमा केली जाईल, अशी ग्वाही पालकमंत्री नितेश राणे यांनी दिली आहे. फळबाग विमा योजनेअंतर्गत 90 कोटी रुपयांचं वाटप नुकतंच करण्यात आलं आहे.

**हवामान**

अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यानं राज्याच्या विविध भागात काल वादळी पाऊस झाला. उद्या सकाळपर्यंत, राज्याच्या बहुतांश भागात मुसळधार पावसाची शक्यता असून या काळात विदर्भ आणि मराठवाड्याचा काही भाग वगळता इतर सर्वत्र हवामान विभागानं पिवळा बावटा जारी केला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.